# अनुक्रमणिका


| अ.नं | विषय | पान नंबर |
| --- | --- | --- |
| १ | महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याची नियमावली प्रस्तावना | २-३ |
| २ | महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्यातील स्पर्धांचे सर्वसाधारण नियम | ४-६ |
| ३ | सायंटीफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन स्पर्धा | ७-१२ |
| ४ | सायंटीफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन स्पर्धा, प्रवेश पत्र | १३ |
| ५ | पोलीस फोटोग्राफी स्पर्धा सर्वसाधारण नियम | १४-१५ |
| ६ | पोलीस फोटोग्राफी स्पर्धा, प्रवेश पत्र | १६ |
| ७ | पोलीस व्हिडीओग्राफी स्पर्धा सर्वसाधारण नियम | १७-१८ |
| ८ | पोलीस व्हिडीओग्राफी स्पर्धा, प्रवेश पत्र | १९ |
| ९ | संगणक जागृती स्पर्धा सर्वसाधारण नियम | २०-२२ |
| १० | संगणक जागृती स्पर्धा, प्रवेश पत्र | २३ |
| ११ | ॲन्टी सबोटेज चेक स्पर्धा सर्वसाधारण नियम | २४-२६ |
| १२ | ॲन्टी सबोटेज चेक स्पर्धा, प्रवेश पत्र | २७ |
| १३ | श्वान स्पर्धा सर्वसाधारण नियम | २८-३४ |
| १४ | श्वान पथक स्पर्धा प्रवेश पत्र | ३५ |
| १५ | परिशिष्ट - १<br>महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये दिल्या जाणा-या चषकांची यादी | ३६ |
| १६ | परिशिष्ट - २<br>महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये दिल्या जाणा-या पदकांची यादी | ३७ |
| १७ | परिशिष्ट -३<br>महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा आयोजित करणेकामी प्रथमत: आयोजन समिती गठित करण्यात येते. | ३८-३९ |



# महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याची नियमावली

## प्रस्तावना

राष्ट्रीय पातळीवर पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्याची संकल्पना जेव्हा प्रथम मांडण्यात आली होती, त्यापुर्वी पोलीसांना जिल्हा अथवा राज्य स्तरावर इतर जिल्हयातील वा राज्यातील पोलीस बांधवासोबत आपले कामकाजातील अनुभव अथवा कल्पना यांची एकमेकांबरोबर देवाण घेवाण करणेकरिता असा कोणताच मंच नव्हता. पोलीसांच्या कामकाजाच्या पध्दतीत सुधारणा होणेसाठी, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्र येऊन विचारांचे आदान प्रदान करता यावे यासाठी त्यांना एखादा असा मंच उपलब्ध होणे गरजेचे होते की ज्या ठिकाणी ते एकत्र येऊन त्यांच्या कामकाजातील अडचणी बाबत एकमेकांशी विचार विनीमय करुन, त्या अडचणीवर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करतील. या उददेशास अनुसरून सन १९५३ मध्ये पोलीसांसाठी पहिल्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या मेळाव्यामध्ये प्रथम पोलीसांसाठी रायफल व रिव्हॉल्व्हर शुटींगची स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर हळुहळु अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये स्पर्धाप्रकाराचे व स्पर्धकांचे संख्येत वाढ झाली. सध्या घेण्यात येत असलेल्या स्पर्धेमध्ये १. सायंटीफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन, २. पोलीस फोटोग्राफी, ३. पोलीस व्हिडीओग्राफी, ४. कॉम्प्युटर अवेअरनेस, ५. ॲन्टी सॅबोटेज चेक स्पर्धा, ६ श्वान स्पर्धा या स्पर्धा प्रकारांचा समावेश करण्यात आला.

सन २००२ पुर्वी महाराष्ट्र पोलीस दलाच्या संघासाठी राज्य स्तरावर पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन केले जात नसे. महाराष्ट्र पोलीस दलाच्या संघासाठी महाराष्ट्र पोलीस दलातील इच्छुक स्पर्धकांमधून निवड होऊन अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये भाग घेत असे. परंतु सदर

कालावधीत महाराष्ट्र पोलीस दलाचे संघास कोणत्याही प्रकारचे पदक मिळत नव्हते. त्यामुळे अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र पोलीस दलाची कामगिरी उंचावण्याकामी, अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या धर्तीवर, महाराष्ट्र पोलीस दलानेही सन २००२ पासून महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्यास सुरुवात केलेली आहे.

मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडुन, महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्याचे दरवर्षी आयोजन व नियोजन केले जाते. यात सहभागी होणारे संघ हे, त्या त्या परिक्षेत्रिय / आयुक्तालय यांचे स्तरावर होणा-या कर्तव्य मेळाव्यामधुन निवड होऊन महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये भाग घेणेसाठी पाठविले जातात. महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यातील पदक विजेत्या स्पर्धकांमधुन अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यासाठी, महाराष्ट्र पोलीस दलाचे संघाची निवड केली जाते. निवड झालेल्या संघातील स्पर्धकांना राज्य गुप्तवार्ता प्रबोधिनी, रामटेकडी पुणे येथील सराव शिबीरामध्ये तज्ञ प्रशिक्षकांकडुन ४५ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते व त्यानंतर सदरचा संघ हा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये भाग घेण्यासाठी पाठविण्यात येतो.

महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये भाग घेणा-या स्पर्धकांना अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे स्पर्धा नियम माहित असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या तयारीसाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरणारी ही नियमावली आपणास देताना मला आनंद होत आहे. मी अपेक्षा करतो की सदरची नियमावली ही सर्व घटक प्रमुख अभ्यासातील व आपल्या घटकातुन उत्कृष्ट असे अधिकारी व कर्मचारी निवडुन महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये भाग घेण्यासाठी पाठवतील. मी अशीही अपेक्षा करतो की महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यासाठी निवड केलेल्या स्पर्धकांना सदरची नियमावली ही अभ्यासासाठी उपलब्ध करुन दिली जाईल.

**श्री. सुनील रामानंद**
अपर पोलीस महासंचालक,
गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# महाराष्ट्र पोलीस कर्तव्य मेळाव्यातील स्पर्धांचे
# सर्वसाधारण नियम

१. महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा हा दर वर्षी मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे आदेशाने आणि मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे अधिपत्त्याखाली महाराष्ट्रातील निवडलेल्या पोलीस घटकामध्ये आयोजित करण्यात येईल.

२. मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे यांनी नेमलेल्या आयोजनसमिती मार्फत सदर कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात येईल.

३. अ). मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे हे महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याचे ठिकाण व दिनांक याबाबत मा. पोलीस महासंचालक यांचे मान्यतेने निश्चीत करुन सर्व घटकांना कळवतील.

ब). महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये **एकुण ६ प्रकारच्या स्पर्धा** घेण्यात येतील.

i. सायंटीफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन,

ii. पोलीस फोटोग्राफी,

iii. पोलीस व्हिडीओग्राफी

iv. कॉम्प्युटर अवेअरनेस,

v. ॲन्टी सॅबोटेज चेक स्पर्धा,

vi. श्वान स्पर्धा

४. **प्रशासकीय अधिकारी** : पोलीस अधीक्षक, कायदा व संशोधन, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, हे पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन व नियोजनाचे कामकाज पाहतात.

५. **प्रवेश फी** - प्रत्येक सहभागी संघ रुपये ५०,०००/- हे प्रवेश फी म्हणुन "महाराष्ट्र स्टेट पोलीस डयूटी मीट फंड" अकाऊंट नंबर- ३१४१९६७०३३५, IFS Code SBIN०००४५४, Branch Code - ००४५४ यावर जमा करतील व ई मेल आय डी cid.narcotics@gmail.com अथवा ०२०-२५६३८४४३ या फॅक्सवर कार्यालयास कळवतील.

६. स्पर्धकांच्या राहण्याची व जेवणाची सोय ही आयोजनाच्या ठिकाणी निश्चित करण्यात आलेल्या कॅम्प मध्ये केली जाईल. भोजन व्यवस्था ही सशुल्क असेल तसेच सर्व संघप्रमुख हे आपल्या संघातील स्पर्धकांचा मेस अग्रीम एकत्रित करुन आणतील. तसेच सर्व संघ प्रमुख कॅम्प सोडण्यापुर्वी, मेस संबंधाने झालेल्या खर्चाची पुर्तता करुन, नंतरच कॅम्प सोडतील.

७. **कॅम्प नियंत्रण अधिकारी** - कॅम्प मध्ये नियंत्रण अधिकारी म्हणुन, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.पुणे यांचेकडील, पोलीस उप अधीक्षक दर्जाचे अधिकारी असतील व त्यांना सहाय्य करणेकामी ०२

पोलीस निरीक्षक आणि आवश्यक तेवढे पोलीस कर्मचारी यांची नेमणुक केली जाईल. त्यांची कर्तव्ये खालीलप्रमाणे..

i. स्पर्धक अधिकारी / कर्मचारी यांची राहण्याची व जेवणाची सोय पाहणे व आजुबाजूच्या परीसराची स्वच्छता ठेवणे.

ii. कर्तव्य मेळाव्यासाठी येणारे संघातील स्पर्धकांना रेल्वे स्टेशन अथवा बस स्टॅन्ड या ठिकाणांहून आणण्यासाठी वाहनांची व्यवस्था करुन, त्यांचे निवासस्थानाची व्यवस्था करणे व स्पर्धेनंतर स्पर्धकांना रेल्वे स्टेशन अथवा बस स्टॅन्ड येथे सोडण्याची व्यवस्था करणे.

8. **घटकाचे रिपोर्टींग** - सर्व घटकांचे संघ हे स्पर्धा सुरु होण्याचे एक दिवस अगोदर निश्चित केलेल्या दिनांक वेळेस व ठिकाणी महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्या करीता स्थापित नियंत्रण कक्षास रिपोर्ट करतील तसेच सर्व स्पर्धक आपले घटकाचे ओळखपत्र व दोन पासपोर्ट साईजचे फोटो हे न विसरता आपले सोबत आणतील.

9. **गणवेश व उपकरणे-** सर्व स्पर्धक हे स्पर्धे दरम्यान गणवेश परिधान करतील. तसेच स्पर्धेच्या वेळी <u>खांदयावरील पद - चिन्हे दिसणार नाहीत</u> याबाबत काळजी घेतील. तसेच सर्व स्पर्धक व संघप्रमुख हे आयोजन समितीतर्फे त्यांना देण्यात आलेले ओळखपत्र जवळ बाळगतील. सर्व स्पर्धक आप आपल्या स्पर्धा प्रकारासाठी लागणारे साहित्य/ इन्व्हेस्टिगेशन कीट हे स्वतः बरोबर आणतील.

10. **संघ प्रमुख** - प्रत्येक संघाचा राजपत्रित अधिकारी हा संघ प्रमुख असेल. संघातील सर्व स्पर्धकांवर त्याचे नियंत्रण असेल. तसेच स्पर्धकास कोणत्याही स्पर्धेबाबत आक्षेप घ्यायचा असल्यास, संघप्रमुख हा संघाच्या वतीने आपला आक्षेप, योग्य ती फी भरुन, पंच व अपील समितीकडे नोंद करतील. संघ प्रमुख हे संघाने जिंकलेल्या चषकांचा संघाच्यावतीने स्विकार करतील सर्व संघप्रमुख हे दररोज सायंकाळी मेळाव्याचे नियंत्रण कक्ष येथे, मिटींगकामी हजर राहतील व तेथे देण्यात येणाऱ्या सुचना हया, त्यांचे संघातील स्पर्धकांना कळवतील.

11. **चषक** - फिरत्या चषकांव्यतिरीक्त आयोजन समितीकडून प्रत्येक स्पर्धाप्रकारातील विजेत्या स्पर्धकांना प्रथम, व्दितीय, तृतीय स्थानाचे पदक देण्यात येईल.

i. स्पर्धेमध्ये भाग घेणा-या स्पर्धकाची पोलीस दलात कमीत कमी १ वर्षाची सेवा पुर्ण झालेली असावी.

ii. तसेच स्पर्धक हा त्याने निवडलेल्या स्पर्धाप्रकारामध्ये असलेल्या नियमांच्या निकषास पात्र असावा.

iii. प्रत्येक स्पर्धक हा एकावेळी एकाच स्पर्धाप्रकारात भाग घेऊ शकतो. एकावेळी दोन स्पर्धाप्रकारात भाग घेतल्यास व दोन्ही स्पर्धा एकाच वेळी असल्यास स्पर्धकाला कोणत्याही एकाच स्पर्धेत भाग घेता येईल, त्यांचेसाठी स्पर्धेच्या वेळेत कोणताही बदल करण्यात येणार नाही.

iv. वरीलपैकी कोणत्याही स्पर्धेत मागील तीन वर्षातील AIPDM (अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा ) मधील पदक विजेत्यांना सहभाग घेता येणार नाही.

१३. **आक्षेप नोंदविणे बाबत**: स्पर्धे दरम्यान एखादया संघ प्रमुखास स्पर्धेच्या नियमांबाबत, निकालाबाबत किंवा कोणत्याही इतर प्रकारचा आक्षेप असल्यास, त्याने स्पर्धा संपल्यानंतर दोन तासाचे आत सदरचा आक्षेप लेखी स्वरुपात, योग्य ती फी भरून, त्या स्पर्धेच्या मुख्य पंचाकडे सादर करावा. पंचांनी पुढे तो त्यांचे रिपोर्टाने अपील समितीकडे दाखल करावा.

१४. **अपात्रतेबाबत** : एखादया स्पर्धे दरम्यान कोणत्याही संघातील स्पर्धकाने कोणत्याही प्रकारचे बेशिस्त वर्तन केल्याचे आढळून आल्यास त्या स्पर्धकास अपात्र ठरविण्यात येईल.

१५. **निकाल** : प्रत्येक स्पर्धेचा निकाल हा स्पर्धेनंतर त्याच दिवशी सायंकाळी अथवा दुसरे दिवशी जाहिर करण्यात येईल. सदरचा निकाल हा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्या करीता स्थापित नियंत्रण कक्षातील सूचनापटावर लावण्यात येईल. निकाल बाबत पंचांचा निर्णय हा अंतिम राहील.

१६. **परेड**: स्पर्धे दरम्यान, दररोज सकाळी व सायंकाळी सर्व संघ प्रमुखांनी त्यांचे संघातील स्पर्धकांना उदघाटन व समारोपाचे सराव परेडकरिता हजर ठेवणे, ही सर्वस्वी त्यांची जबाबदारी राहिल.

१७. **संघाचा ध्वज** : प्रत्येक संघप्रमुख यांनी त्यांचे आयुक्तालयाचे परिक्षेत्राचे दोन ध्वज (पैकी एक ध्वज मैदानात लावण्याकरिता ६' x ४' व एक मार्च पास करीता ३' x २' मापाचा) बरोबर आणावेत.

# १. <u>सायंटीफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन स्पर्धा</u>

सायंटीफिक एड टु इन्व्हेस्टीगेशन स्पर्धा ही खालील तीन प्रकारामध्ये विभागलेली आहे.

i) लेखी परिक्षा - ५० गुण
ii) तोंडी परिक्षा - ५० गुण
iii) प्रात्यक्षिक परिक्षा - ५० गुण

<u>या स्पर्धा प्रकारात एकूण ८ उपप्रकार असून ते खालीलप्रमाणे-</u>

i) क्राईम इन्व्हेस्टिगेशन, क्रिमिनल लॉज्, रुल्स् ॲन्ड प्रोसिजरस् ॲन्ड कोर्ट जजमेंटस् (लेखी परिक्षा)
ii) फॉरेन्सिक सायन्स (लेखी परिक्षा)
iii) मेडीको लिगल (तोंडी परिक्षा)
iv) फिंगर प्रिंट (प्रात्यक्षिक व तोंडी परिक्षा)
v) लिफ्टींग, पॅकींग ॲन्ड लेबलिंग (प्रात्यक्षिक परिक्षा)
vi) फोटोग्राफी (प्रात्यक्षिक परिक्षा)
vii) पोलीस पोर्ट्रेट (लेखी परिक्षा)
viii) ऑब्झर्वेशन (लेखी परिक्षा)

१. परिक्षेत्रे/ आयुक्तालये यांनी या स्पर्धेकरिता पाच स्पर्धकांचा एकच संघ पाठवावा. त्यात ०१ पो. नि. ०२ स.पो.नि./ पो उप निरि, ०१ सहा. पो. उप निरि/ पो.हवा. व ०१ पो.शि. यांचा समावेश असावा.
   अ) प्रत्येक संघातील ०३ अधिकारी हे उपप्रकार i) ते vi) मध्ये स्वतंत्रपणे भाग घेऊ शकतात. इतर दोन कर्मचारी हे फक्त vii) व viii) क्रमांकाचे उपप्रकारातच भाग घेतील.
   ब) ज्या संघात ५ पेक्षा कमी स्पर्धक आहेत व त्या संघाने सांघिक कामगिरीत जास्त पदके मिळविली असतील, अशा वेळी संघात ५ पेक्षा कमी स्पर्धक आहेत, या कारणावरुन तो संघ बाद होणार नाही.
   क) संघातील सदस्यांचे नाव हुद्दा, घटकाचे नाव व तो कोणत्या स्पर्धा प्रकारात सहभाग घेणार आहे, याबाबतचा स्पष्ट उल्लेख त्या स्पर्धेच्या प्रवेश अर्जात करण्यात यावा स्पर्धेच्या प्रवेश अर्जात नमुद करण्यात आलेल्या स्पर्धकांव्यतिरिक्त इतर स्पर्धकास स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

२. जिल्हा अंगुलीमुद्रा विभागात, अंगुलीमुद्रा तज्ञ म्हणुन कर्तव्यावर असलेल्या, अधिकारी/कर्मचारी यांना, या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.

३. स्पर्धक अधिकारी / कर्मचारी यांनी मागिल तीन वर्षात झालेल्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यात पदक मिळविलेले नसावे.

४. स्पर्धकांचे प्रवेश अर्जावर, आयोजन समितीचे नियमांप्रमाणे स्पर्धकांची स्पर्धेकरिता निवड करण्यात आली असले बाबत, विपोमनि/पोलीस आयुक्त यांनी स्वाक्षरी करावी.

## A) फॉरेन्सीक सायन्स (लेखी परीक्षा)

१. फॉरेन्सीक सायन्स लेखी परीक्षा या परीक्षेचा कालावधी एकुण २ तास इतका असुन त्यासाठी एकूण ५० गुण असतील.

२. प्रत्येक उप विभागामध्ये जास्तीत जास्त ५ मुख्य प्रश्न, आवश्यकतेनुसार त्यातील उप- प्रश्नासह असतील. प्रत्येक मुख्य प्रश्न हा वेगवेगळया गुन्हयाच्या तपासाच्या कार्यपध्दतीवर आधारित असेल. या परिक्षेसाठी बसणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनी तपासाच्या संपूर्ण कार्यपध्दतीचे येथे वर्णन करणे अपेक्षित नसुन, या परिक्षेचा उद्देश हा, स्पर्धक अधिकाऱ्यांकडे असलेल्या फॉरेन्सीक सायन्स चे ज्ञानाचा उपयोग ते त्यांचे तपासाच्या तंत्रात कशा प्रकारे करतात हे पहाणे हा आहे.

**उदा.**

क) खिडक्या दरवाज्या वाटे प्रवेश करून कुलूप तोडुन चोरी करणे, घरफोडीचे गुन्हे इत्यादी. हे सर्व गुन्हे करताना वापरलेली साधने ही या परिक्षणाखाली येतात

ख) विष प्रयोगासंबधी संशयीत गुन्हे.

ग) आत्महत्या व खुनाच्या घटना.

घ) अग्निशस्त्रे वापरून केलेले गुन्हे.

ङ) जाळपोळ संबधीचे गुन्हे.

च) खाडाखोड केलेले लिखाण,अदृश्य लिखाण, अधिलिखाण (गिरवणे) या संबंधी प्रश्न निर्माण झाल्यास, दाखल गुन्हयांचे तपासात हस्ताक्षर, फोटोग्राफी या वेगवेगळया तंत्रांचे सहाय्याने तपास करण्यात येणारे गुन्हे.

छ) वाहनांच्या अपघात संबधाने, तसेच वादग्रस्त दस्तऐवजाच्या अनुषंगाने विचारले जाणारे प्रश्न, यांचा फॉरेन्सीक सायन्स लेखी परिक्षा पेपर व तोंडी परिक्षेमध्ये समावेश असेल.

३. तपासी अधिकारी हा तपासादरम्यान सतत रक्त, विर्य व इतर जैविक डाग,केस, काच, माती,लाकडी तुकडे, धागे, पेपर, कपडे इत्यादी भौतिक पुराव्याच्या दृष्टीने उपयुक्त वस्तुंच्या संपर्कात येत असतो. या पुरावाजन्य वस्तुंच्या अनुषंगाने एखाद-दुसरा प्रश्न परिक्षकांकडुन स्पर्धकांना विचारला जाईल. सदरचे प्रश्न हे अशा प्रकारे विचारले जातील की, ज्यामुळे स्पर्धकांकडुन वरील भौतीक पुरावे हे कोणत्याप्रकारच्या परीक्षणाकामी पाठविले असता, गुन्हयाची उकल होणेच्या दृष्टीने योग्य ती माहिती मिळेल, याबाबतचे समाधानकारक उत्तरे देतील.

## B) मेडीको लिगल टेस्ट (तोंडी परीक्षा)

१. मेडीको लिगल या विषयाची तोंडी परीक्षा ही एकुण ५० गुणांची असेल.

२. परीक्षा सुरु होण्यापुर्वी स्पर्धकांना ३० मिनीटांचा वेळ हा या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा अभ्यास करणेकामी देण्यात येईल. स्पर्धकांना सदर प्रश्नांचे अनुषंगाने संक्षिप्त टिपण करण्यास मुभा देण्यात येईल. परंतु त्यांना विस्तृत टिपण करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

3. त्यानंतर खालील विषयांच्या अनुषंगाने प्रश्न विचारले जातील. उदा. मृत देहाचे परीक्षण व त्यावरील जखमांचे परीक्षण, अपघातस्थळ/ घटनास्थळाचे निरीक्षण, भौतिक व जैविक पुराव्याचे संकलन, त्या

पुरावाजन्य पदार्थाचे परीक्षणकामी पाठविण्याची पध्दत इत्यादी. परीक्षक हे त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणे प्रश्नांची मांडणी करतील.

४. प्रत्येक स्पर्धकांसाठी तोंडी परीक्षेचा कालावधी हा १५ मिनीटे इतका असेल.

## C) क्राईम इन्व्हेस्टिगेशन, क्रीमिनल लॉज्, रुल्स् ॲन्ड प्रोसिजरस् ॲन्ड कोर्ट जजमेंटस् (लेखी परीक्षा)

१. **क्राईम इन्व्हेस्टिगेशन** या विषयावरील प्रश्न हे प्रत्येकी चार पर्यायी उत्तरे असलेले, अशा स्वरुपाचे असुन त्यामध्ये

i) क्राईम इन्व्हेस्टिगेशन

ii) लॉ ॲन्ड प्रोसिजर्स / रुल्स

(iii) जजमेंटस

या विषयांवर अधारीत प्रश्न असतील.

### २. सदर प्रश्न पत्रिका ५० गुणांची असून प्रत्येक प्रश्नास १ मार्क असेल व परिक्षेचा कालावधी हा २ तासांचा असेल.

**i) क्राईम इन्व्हेस्टिगेशन** - १५ गुण हे खालील विषया वरील प्रश्नाबाबत असतील.

a) मनुष्यवधाच्या गुन्हयाचा तपास

b) जबरीचोरी व दरोडा

c) बलात्कार

d) दंगलीबाबतचे गुन्हे

**ii) क्रिमिनल लॉज् / रुल्स्** - १५ गुण हे मुख्य व किरकोळ कायदे संदर्भातील प्रश्नाबाबत असतील.

**iii) रुल्स ॲन्ड प्रोसीजर्स** १० गुण हे खालील विषयावरील प्रश्नाबाबत असतील.

a) प्रथम खबरी अहवाल

b) इन्क्वेस्ट पंचनामा

c) ओळख परेड

d) आरोपीची चौकशी

e) शोध व जप्ती संबधाचे पंचनामे.

**iv) कोर्ट जजमेंटस् इत्यादी** - १० गुण हे उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांचेकडील जजमेंटस व रुल्स या विषयावरील प्रश्नाबाबत असतील. यामध्ये ५ किंवा १० गुणांचे विस्तारात्मक प्रश्न देखिल विचारले जातात. उदा. भादवि क. ३७६ मधिल कलमात विशाखा कमिटीचे अहवालानुसार करण्यात आलेल्या सुधारणांचे विश्लेषण.

## D) फिंगरप्रिंटस

१. फिंगरप्रिंट प्रॅक्टीकल परीक्षेसाठी एकुण ५० गुण असतील.

२. परीक्षेसाठी अगोदरच तयार केलेल्या गुन्हयाच्या देखाव्यामधील २ किंवा ३ वस्तुवरील अप्रकट अंगुलीमुद्रांचे ठसे जतन करणेबाबतचा प्रश्न असेल. ज्या वस्तुवरील ठसे घेणे आहे, त्या वस्तुचे स्वरुप असे असेल की, ठसे विकसीत करणेकामी २ ते ३ प्रकारच्या पावडरचा उपयोग वस्तुच्या पृष्ठभागाच्या स्वरुपानुसार स्पर्धकांना करावा लागेल.

३. प्रत्येक स्पर्धकाला अप्रकट अंगुली मुद्रा ठसे विकसीत करण्यासाठी व ते जतन करणेसाठी २० मिनीटांचा कालावधी देण्यात येईल. त्यानंतर परिक्षक सदरचे प्रिंट तपासुन स्पर्धकांना गुण देतील व नवीन स्पर्धकांसाठी नवीन देखावा तयार करतील. सदर स्पर्धकरिता ठसे विकसित करणेसाठी आवश्यक असलेली पावडर ही गुन्हे अन्वेषण विभागाकडुन पुरविण्यात येईल.

## E) पोलीस पोर्ट्रेट

१. पोलीस पोर्ट्रेटसाठी एकुण ५० गुण असतील. पोलीस पोर्ट्रेट परीक्षेमध्ये स्पर्धकांना एखादया इसमाचा फोटो ३ ते ५ मिनिटांसाठी (जो परीक्षेअगोदर परीक्षकांनी ठरविलेला असेल.) दाखवला जाईल. त्यानंतर सदरचा फोटो इतर फोटोसोबत एकत्र करुन स्पर्धकांना दाखविण्यात येईल व त्यांना परिक्षकांनी दाखविलेला फोटो कमीत कमी वेळेत ओळखुन उचलण्यास सांगण्यात येईल. या बाबतचा वेळ परीक्षकांनी ठरविलेला असेल.

२. किंवा परीक्षक हे स्पर्धकांना एखादा इसम थोडया वेळासाठी दाखवुन त्याचे पुर्ण वर्णन इग्रजी किंवा मराठीमध्ये करावयास सांगतील.

3. किंवा परीक्षक स्पर्धकांना एखादे इसमाचे चित्र / पोर्ट्रेट देतील आणि त्यानंतर सदर इसमास एखादया घोळक्यामधुन ठरावीक वेळेत ओळखण्या बाबत सांगतील. वरील फोटोग्राफ / इसम यांचेवर आधारीत परीक्षा यांचेमध्ये काही वेळ देण्यात येईल तो किती असेल याबाबत परीक्षक निर्णय घेतील. सदर परिक्षेसाठी एकुण वेळ ही ३० मिनिटांपेक्षा जास्त असणार नाही.

## F) ऑब्झर्वेशन

१. ऑब्झर्वेशन या स्पर्धाप्रकारासाठी एकुण ५० गुण असतील. सदर स्पर्धकांना एखादया गुन्हयांच्या घटनास्थळाचा फोटो हा ५ ते १० मिनिटे (परीक्षेअगोदर परीक्षकांनी ठरविलेला असेल.) दाखविण्यात येईल. त्यानंतर काही वेळाने स्पर्धकांना सदर घटनास्थळाच्या फोटोच्या अनुषंगाने प्रश्न विचारण्यात येतील व सदरच्या प्रश्नांची उत्तरे देणेकामी एकुण ३० मिनिटांचा वेळ देण्यात येईल.

2. किंवा त्यांना एखादया घटनेसंदर्भाने रिपोर्ट वाचावयास दिला जाईल व त्या रिपोर्टाच्या अनुषंगाने प्रश्न विचारले जातील.

3. किंवा स्पर्धकांना एखादया गुन्हयाचा देखावा असलेल्या रुममध्ये नेऊन त्यांना सदर देखावा काही वेळासाठी दाखविण्यात येऊन, त्यावर त्यांनी काय काय गोष्टी पाहील्या. याबाबत विस्तारपूर्वक लिहीण्यास सांगितले जाईल.

४. यासाठी लागणा-या वेळेबाबत परीक्षक निर्णय घेतील. परंतु सदर परिक्षे साठी एकुण वेळ ही ३०

मिनिटांपेक्षा जास्त असणार नाही.

## G) लिफ्टींग, पॅकींग ॲन्ड लेबलिंग

1. या स्पर्धा परीक्षा प्रकारासाठी एकुण ५० गुण असतील व सदर परिक्षेसाठी एकुण १ तासाचा कालावधी देण्यात येईल. यात १५ गुण ऑब्झर्वेशनसाठी, १५ गुण लिफ्टींग व पॅकींगसाठी, व २० गुण फॉरवर्डींग लेटर साठी असतील. पुरावाजन्य वस्तुमध्ये २ ते ३ वस्तु ठेवण्यात येतील.
2. या परीक्षेत घटनास्थळावरील पुरावाजन्य वस्तूंना हाताळण्याबाबत घ्यावयाची दक्षता, सदर वस्तुंचे पॅकींग, सील करणे व जप्त वस्तु परीक्षणासाठी पाठविण्याकामी फॉरेन्सीक लॅबला पाठविण्यात येणारा रिपोर्ट लिहणे, या गोष्टीचा समावेश असेल.

## H) क्राईम फोटोग्राफी (अधिकारी)

i) या स्पर्धाप्रकारास एकुण ५० गुण असतील. यासाठी स्पर्धक हा व्यावसायीक पोलीस फोटोग्राफर म्हणुन काम करत नसावा किंवा त्याने यापूर्वी अशा प्रकारे काम केलेले नसावे. क्राईमसीन फोटोग्राफीसाठी डिजीटल सायबर शॉट कॅमेरा (कॉम्पेक्ट कैमेरा फिक्सलेन्ससह) व मेमरीचीप / सी एफ कार्ड ४ X ऑप्टीकल झुमसह वापरण्यात यावा.

ii) प्रत्येक स्पर्धकाला देखाव्याचे निरीक्षण करणेसाठी ५ मिनीटे व पुढील ६ फोटो काढणेकामी १० मिनीटांचा कालावधी असा एकूण १५ मिनिटांचा वेळ देण्यात येईल.

iii) या स्पर्धाप्रकारात स्पर्धक एकापाठोपाठ एक असे एकुण ६ फोटो घेईल. ६वा फोटो हा स्पर्धकाच्या चेस्टनंबरचा असेल. याव्यतिरिक्त ७वा फोटो घेतल्यास त्या स्पर्धकास स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

iv) त्यानंतर स्पर्धकाने त्याचे मेमरी चीप / सी एफ कार्ड कॅमे-यामधुन काढून ते परीक्षकांना सुपुर्द करतील.

v) स्पर्धकांना अतिरिक्त फ्लड लाईट इत्यादी सारख्या लाईट वापरु नयेत.

## I) परीक्षक समिती -

सायंटीफिक एड टु इन्व्हेस्टीगेशन या स्पर्धाप्रकारासाठी परीक्षकांच्या एक अथवा त्यापेक्षा जास्त समित्या असतील व त्यावर एक पोलीस अधिक्षक दर्जाचे अधिकारी हे समिती प्रमुख म्हणून खालीलप्रमाणे काम पाहतील.

(i) **लेखी परिक्षा** - या परिक्षेकामी त्या त्या स्पर्धा प्रकाराचे समिती प्रमुख हे न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळे कडील तज्ज्ञ अधिकारी, तज्ज्ञ विधी अधिकारी व शासकीय रुग्णालयाचे वैदयकीय अधिकारी, यांचे मदतीने लेखी परिक्षेकामी प्रश्न संचाचे व सदर प्रश्नांचे उत्तराचे संच तयार करणे व परिक्षा संपल्यावर सदरच्या उत्तर पत्रिका तपासणी करुन निकाल जाहिर करणे, इत्यादी कामे पहातील.

(ii) **तोंडी परिक्षा** - या सदर परिक्षेकामी स्पर्धा प्रकाराचे समिती प्रमुख हे, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडील तज्ज्ञ अधिकारी, तज्ज्ञ विधी अधिकारी व शासकीय रुग्णालयाचे

वैदयकीय अधिकारी यांचे मदतीने तोंडी परिक्षेसाठी प्रश्नसंच व उत्तराचे संच तयार करतील व त्या प्रश्नांचे अनुशंगाने परिक्षा घेवुन, त्यानंतर स्पर्धेचा निकाल जाहिर करणे इत्यादी कामे पहातील.

**(iii) प्रात्यक्षिक परिक्षा-**

a) अंगुलीमुद्रा विभाग, गुअवि पुणे यांचे कडील दोन तज्ञ हे फिंगरप्रिंट या विषयासाठी समिती प्रमुख यांना सहाय्यक परिक्षक म्हणुन काम पहातील.

b) पोलीस पोर्ट्रेट, ऑब्झर्वेशन व लिफ्टींग, पॅकींग ॲन्ड लेबलिंग या स्पर्धा प्रकारासाठी सदर स्पर्धेचे प्रमुख व अंगुलीमुद्रा विभाग गुअवि पुणे यांचे कडील दोन तज्ञ अधिकारी हे परिक्षक म्हणुन कामकाज पहातील.

## J) चषक व पदके -

१. या स्पर्धेत जो संघ सर्वात जास्त गुण प्राप्त करेल त्या संघास, विजेत्या संघासाठी असणारा फिरता चषक प्रदान करण्यात येईल.

२. तसेच वैयक्तिक कामगिरीसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर येणारे स्पर्धकांना अनुक्रमे सुवर्ण, रजत व कांस्य पदके व प्रमाणपत्रे देण्यात येतील.

३. या स्पर्धेतील स्पर्धाप्रकारांसाठी देण्यात येणाऱ्या चषक व पदकांची यादी परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२ येथे नमुद आहे.

# <u>सायंटीफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन स्पर्धा, प्रवेश पत्र -</u>

१. <u>संघाचे नाव -</u>

२. <u>संघ प्रमुख अधिकारी यांचे नाव -</u>

| अ.नं | स्पर्धकाचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |

प्रमाणित करण्यात येते की,

१. वर नमुद स्पर्धकांपैकी कोणीही फिंगर प्रिंट ब्यूरो मध्ये यापूर्वी तज्ञ म्हणून काम केलेले नाही तसेच प्रत्येक स्पर्धकाची पोलीस खात्यामध्ये एक वर्षांचा सेवाकाल पुर्ण झालेला आहे (स्पर्धेच्या दिनांकापर्यंत).

2. वरील पैकी कोणत्याही स्पर्धकाने यापूर्वीच्या तीन अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये भाग घेतलेला नाही.

३. वरील स्पर्धकांची प्रवेश शुल्क हे "महाराष्ट्र राज्य पोलीस डयुटी मीट फंड यांचे खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

विपोमनि/पो. आयुक्त.

# 2.पोलीस फोटोग्राफी स्पर्धा

## सर्वसाधारण नियम-

१. पोलीस फोटोग्राफी ही स्पर्धा पोलीस अधिकारी, कर्मचारी व पोलीस फोटोग्राफर यांचेसाठी खुली असेल. स्पर्धकांनी त्यांचेसोबत त्यांचे विभागकडुन त्यांना देण्यात आलेला कॅमेरा व मेमरी कार्ड सोबत आणावे.

२. प्रत्येक संघात जास्तीत जास्त दोन स्पर्धकांना या स्पर्धेत भाग घेता येईल

३. या स्पर्धेत सहभागी होणारा स्पर्धक हा मागिल तीन वर्षातील अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यांमध्ये क्रमांक १, २ वा ३ चा विजेता नसावा.

४. स्पर्धा बंद खोलीत अथवा मोकळया जागेत घेण्यात येईल. त्यात गुन्हयाचा देखावा, वाहन अपघात किंवा कोणताही वस्तुजन्य पुरावा असलेला देखावा उभारुन त्या देखाव्यावर आधारित स्पर्धा घेण्यात येईल.

५. **कॅमेरा** - डीजीटल SLR कॅमेरा वा कोणताही डीजीटल कॅमेरा वापरण्यात यावा.

६. **प्रक्रीया** -

१. पहिला फोटो हा स्पर्धकाने आपले चेस्ट नंबरचा घेणे आवश्यक आहे. त्यानंतर स्पर्धकांनी त्यांचेकडील कॅमे-याने घटनास्थळाचे सलग चार फोटो घेतलेबाबतची खात्री परिक्षकांनी करावी. स्पर्धकाला कोणत्याही कोनातून घटनास्थळाचे फक्त चारच फोटो घेता येतील. प्रत्येक फोटोमध्ये स्पर्धकांनी त्यांना दिलेला चेस्ट नंबर फोटोमध्ये येईल याची दक्षता घ्यावी.

२. त्यानंतर त्यातील मेमरी चीफ/सीएफ कार्डातील कोणताही फोटो डिलीट न करता त्याचे प्रिंटस संगणकावर लोड करुन परीक्षकांना दाखवतील.

३. स्पर्धकांना इनडोअर फोटोग्राफीसाठी, फ्लॅश लाईट व आऊटडोअर फोटोग्राफीसाठी, एक्सपोजर मीटर तसेच ट्रायपॉड व फिल्टर यांचा वापर करता येईल.

४. फोटोसोबत सादर करण्यात येणा-या स्लिपवर खालील माहिती असावी.

- नाव :--
- संघाचे नावे-:
- कॅमे-याची बनावट व कंपनी-
- एक्सपोजर : लेन्सस्टॉप ----- -शटरस्पिड–
- फिल्म-: ----- फिल्टर ----- पेपर

५. ही स्पर्धा एकुण १०० गुणांची असून, त्यात स्पर्धकांना फोटो काढण्याच्या प्रात्यक्षिक ज्ञानाव्यतिरीक्त फोटोग्राफीबाबत सिध्दांतिक ज्ञान असणेही गरजेचे असल्याने, सर्वसामान्य फोटोग्राफी या विषयावर स्पर्धकांची १० गुणांची तोंडी परीक्षा परिक्षकांकडुन घेण्यात येईल.

६. परिक्षेचा निकाल जाहीर झाल्यावर स्पर्धकांना त्यांचे मेमरीकार्ड परत करण्यात येईल.

७. **चषक व पदके** - पहिल्या क्रमांकाचे संघाला पोलीस फोटोग्राफी साठी असलेला फिरता चषक प्रदान करण्यात येईल. प्रत्येक १, २ व ३ क्रमांकाचे विजेत्या स्पर्धकांना सुवर्ण, रजत व कांस्य पदके, तसेच प्रमाणपत्र देणेत येईल.

८. **परिक्षक** - या स्पर्धेसाठी या स्पर्धा समितीचे प्रमुख व इतर शासकीय/निमशासकीय /महाविदयालयातील फोटोग्राफी विषयातील दोन तज्ञ अधिकारी हे, परिक्षक म्हणुन काम पहातील.

# <u>पोलीस फोटोग्राफी स्पर्धा, प्रवेश पत्र -</u>

१. <u>संघाचे नाव -</u>

२. <u>संघ प्रमुख अधिकारी यांचे नाव -</u>

| **अ.नं** | **स्पर्धकाचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |

प्रमाणित करण्यात येते की,

१. वरील प्रत्येक स्पर्धकाची पोलीस खात्यामध्ये एक वर्षाचा सेवाकाल पुर्ण झालेला आहे (स्पर्धेच्या दिनांकापर्यंत).
२. वरील पैकी कोणत्याही स्पर्धकाने मागिल तीन वर्षातील अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यांमध्ये भाग घेऊन त्यामध्ये १, २ वा ३ क्रमांकाचा विजेतेपद मिळविलेले नाही.
३. वरील स्पर्धकांची प्रवेश शुल्क हे "महाराष्ट्र राज्य पोलीस डयूटी मीट फंड यांचे खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

विपोमनि/पो. आयुक्त.

# ३. पोलीस व्हिडीओग्राफी स्पर्धा

## सर्वसाधारण नियम-

१. पोलीस व्हिडीओग्राफी ही स्पर्धा पोलीस अधिकारी, कर्मचारी व पोलीस फोटोग्राफर/ व्हिडीओग्राफर यांचेसाठी खुली असेल. स्पर्धकांनी त्यांचेसोबत त्यांचे विभागकडून त्यांना देण्यात आलेला कॅमेरा, मेमरी कार्ड व इतर आवश्यक साहित्य आणावे.

२. प्रत्येक संघात जास्तीत जास्त दोन स्पर्धकांना या स्पर्धेत भाग घेता येईल:

३. कोणताही स्पर्धक हा मागिल तीन वर्षातील अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यांमध्ये भाग घेऊन त्यामध्ये १,२ व ३ क्रमांकाचा विजेता नसावा.

४. ही स्पर्धा मोकळया जागेत घेण्यात येईल. त्यात गुन्हयाचा देखावा, वाहन अपघात, गर्दी, सभा, VIP सुरक्षा, खेळांच्या स्पर्धा किंवा कोणताही वस्तुजन्य पुरावा असलेला देखावा, उभारून त्या देखाव्यावर आधारित अशी स्पर्धा घेण्यात येईल.

५. **कॅमेरा** - फक्त मेमरी कार्ड असलेला हॅन्डीकॅम हा कॅमेरा व्हिडीओग्राफीसाठी वापरता येईल.

६. **प्रक्रीया -**

i. प्रत्येक स्पर्धकास पंचासमक्ष बॅटरी व मेमरी कार्ड, कॅमे-यात टाकणेकामी १० सेकंद दिले जातील. त्यानंतर कॅमेरा पंचांकडे सोपवुन, स्पर्धकांना २ मिनिटांचा वेळ हा गुन्हयाच्या देखाव्याचे निरिक्षण करणे करिता देण्यात येईल.

ii. त्यानंतर ९० सेकंदाचा वेळ हा स्पर्धकास, देखाव्याचे शिर्षक, दिनांक / वेळ याचे चित्रीकरणाकरिता देण्यात येईल व लगेचच ५ मिनिटांचा वेळ हा स्पर्धेच्या देखाव्याचे चित्रीकरणाकरिता देण्यात येईल. चित्रीकरण करतांना, घटनेचे ठिकाण, पुराव्याचे दृष्टीने उपयुक्त वस्तु इत्यादी गोष्टींचे चित्रीकरण केले जाईल, याची स्पर्धकांनी दक्षता घ्यावी.

iii. संदिग्धता टाळण्या करिता प्रत्येक चित्रीकरणामध्ये स्पर्धकांनी, त्यांना दिलेला चेस्ट नंबर चित्रीकरणात येईल याची दक्षता घ्यावी.

iv. स्पर्धा संपल्यानंतर स्पर्धकाने कॅमे-यातील मेमरी कार्ड काढून त्यावर आपला चेस्ट नंबर नोंदवून ते पंचांकडे सोपवावे.

v. स्पर्धेचा निकाल जाहीर झाल्यावर, स्पर्धकांचे मेमरी कार्ड परत देण्यात येतील.

**७. गुण** - सदर स्पर्धेसाठी गुणांची वर्गवारी पुढील प्रमाणे

| | |
|---|---|
| अ. निरिक्षण कौशल्य | - १० गुण |
| ब. घटनेचे दोन कोनांतून चित्रीत केलेले वर्णन वाहनाचे नंबरप्लेट इ. | - २० गुण |
| क. घटनेचे सर्वसाधारण चित्रीकरण | - १० गुण |
| ड. जवळून केलेले चित्रीकरण | - १० गुण |
| इ. महत्वाचे दुवे / त्यांचे वर्णन | - ३० गुण |
| फ. कॅमेरा हाताळण्याचे कौशल्य | - १० गुण |
| ग. सर्वसाधारण दर्जा | - १० गुण |
| एकुण | - १०० गुण |

८. **चषक व पदके** - पहिल्या क्रमांकाचे संघाला पोलीस फोटोग्राफी साठी असलेला फिरता चषक प्रदान करण्यात येईल. प्रत्येक १, २ व ३ क्रमांकाचे विजेत्या स्पर्धकांना सुवर्ण, रजत व कांस्य पदके, तसेच प्रमाणपत्र देणेत येईल.

९. **परिक्षक** - या स्पर्धेसाठी या स्पर्धा समितीचे प्रमुख व इतर शासकीय निमशासकीय / महाविदयालये येथिल फोटोग्राफी विषयातील दोन तज्ञ हे परिक्षक म्हणून काम पहातील.

# <u>पोलीस व्हिडीओग्राफी स्पर्धा, प्रवेश पत्र -</u>

१. <u>संघाचे नाव -</u>

२. <u>संघ प्रमुख अधिकारी यांचे नाव -</u>

| अ.नं | स्पर्धकाचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |

प्रमाणित करण्यात येते की,

१. वरील प्रत्येक स्पर्धकाची पोलीस खात्यामध्ये एक वर्षाचा सेवाकाल पुर्ण झालेला आहे (स्पर्धेच्या दिनांकापर्यंत).
२. वरील पैकी कोणत्याही स्पर्धकाने मागिल तीन वर्षातील अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यांमध्ये भाग घेऊन त्यामध्ये १, २ वा ३ क्रमांकाचा विजेतेपद मिळविलेले नाही.
३. वरील स्पर्धकांची प्रवेश शुल्क हे "महाराष्ट्र राज्य पोलीस डयूटी मीट फंड यांचे खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

विपोमनि/पो. आयुक्त.

# ४. संगणक जागृती स्पर्धा

१. या स्पर्धेचा मुख्य उददेश पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्यात संगणकासंदर्भात जागरुकता निर्माण करुन संगणकाचा वापर करणेसाठी त्यांना प्रोत्साहीत करणे असा आहे.

२.**सर्वसाधारण नियम- -**

i) वरील प्रत्येक स्पर्धकाची पोलीस खात्यामध्ये एक वर्षाचा सेवाकाल पुर्ण झालेला असावा. (स्पर्धेच्या दिनांकापर्यंत).

ii) वरील पैकी कोणत्याही स्पर्धकाने मागिल तीन वर्षातील अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यांमध्ये भाग घेऊन त्यामध्ये १, २ वा ३ क्रमांकाचे विजेतेपद मिळविलेले नसावे.

iii) एका संघाचे ४ अधिकारी / कर्मचारी या स्पर्धेत भाग घेतील?

**३. कम्प्युटर अवेअरनेस स्पर्धाचे प्रकार खालीलप्रमाणे**

**i)** **इव्हेंट - I ऑब्जेक्टीव्ह टेस्ट** - यामध्ये संगणकासंदर्भातील प्राथमिक माहिती व त्यावर आधारीत, पर्यायी उत्तरे असलेले वस्तुनिष्ट प्रश्न या स्वरुपाची ऑनलाईन परीक्षा घेतली जाते. प्रत्येक चुकीच्या प्रश्नाला १/४ गुण वजा केले जातात.

**ii)** **इव्हेंट II ऑफिस ऑटोमेशन -** यामध्ये MS WORLD, MS EXCEL या घटकांचा समावेश आहे.

**iii)** **इव्हेंट - III प्रोग्रामिंग अॅबिलीटी** - यामध्ये स्पर्धकांना JAVA किंवा NET / .ASP या पैकी एका प्रोग्रामिंग भाषेवर आधारीत परीक्षा घेण्यात येईल.

**iv)** **इव्हेंट - IV चॅम्पीयन आय टी प्रोजेक्ट** - हा प्रकार वरील इव्हेंट | ते III या स्पर्धांशी संबधीत नाही. या स्पर्धेमध्ये वरिष्ठ पोलीस अधीकारी यांचे सह पोलीस अंमलदार सहभागी होऊ शकतात. कोणत्याही जिल्हा किंवा आयुक्तालय यांनी पोलीस उपयुक्ततेच्या दृष्टीकोणातून एखादी कार्यप्रणाली विकसीत केली असेल व तिचा पोलीस कामकाजास उपयोग होत असेल, तर त्या बाबतचा सविस्तर अहवाल व सादरीकरण, हे मेळाव्याच्या एक महिना अगोदर स्वतंत्रपणे करावे. विकसीत केलेली कार्यप्रणाली किंवा अॅप्लीकेशन हे पोलीस खात्यातील अधीकारी किंवा कर्मचारी यांनीच विकसीत केलेली असावी. खाजगी व्यवसायीकाकडून तयार करून घेवून सादरीकरण करण्यात येवू नये.

**४ आयोजनाची पध्दत -**

i. इव्हेंट I व II या वैयक्तीक स्पर्धा असतील व इव्हेंट III ही सांघिक स्पर्धा असेल. प्रत्येक स्पर्धकाचे गुण वैयक्तीक स्पर्धेतील गुणांची बेरीज ही सांघिक गुण काढणेकामी विचारात घेतली जाईल.

ii. इव्हेंट I व III मध्ये एका संघामधील दोन स्पर्धकांचा संघ भाग घेऊ शकतील. इव्हेंट || मध्ये एका संघाचा एकच स्पर्धक भाग घेऊ शकतील.

iii. प्रत्येक स्पर्धक हा एकापेक्षा जास्त इव्हेंटमध्ये भाग घेऊ शकतो.

iv. इव्हेंट I मध्ये ASI /HC/PN/PC व इव्हेंट II व III मध्ये PC ते Dy.SP पदापर्यंतचे संघातील दोन स्पर्धक, असे भाग घेऊ शकतील.

v. इव्हेंट IV - वरिष्ठ दर्जाचे अधिकारी इव्हेंट IV मध्ये भाग घेऊन पोलीसांचे कामकाजाचे दृष्टीने उपयुक्त प्रोजेक्टबाबतचे सादरीकरण मेळाव्याच्या एक महिना अगोदर करतील.

vi. इव्हेंट 1 साठी एकुण १०० गुणांच्या परीक्षेसाठी ९० मिनीटांचा कालावधी देण्यात येईल. इव्हेंट II व III साठी एकुण १०० गुणांच्या परीक्षेसाठी ६० मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.

## ५. **परिक्षक** -

या स्पर्धेसाठी या स्पर्धा समितीचे प्रमुख व संगणक शाखा गुन्हे अन्वेषण विभागाकडील एक अथवा दोन संगणक तज्ञ हे परिक्षक म्हणुन काम पहातील.

## ६. गुणांची बरोबरी झाल्यास खालील पध्दत वापरण्यात येईल.

I. **इव्हेंट 1 -** जर दोन स्पर्धकांना समान गुण मिळाल्यास, त्याचे चुकीच्या उत्तरांची गणना करुन, त्यातील कमी चुकीची उत्तरे असणा-या स्पर्धकास विजेता घोषित करण्यात येईल. संघातील दोन स्पर्धकांचे गुणांची सरासरी ही त्या संघाच्या चषकासाठी ग्राहय धरली जातील.

II. **इव्हेंट II** - जर दोन स्पर्धकांना समान गुण मिळाल्यास, त्यांचे चुकीच्या उत्तरांची गणना करुन, त्यातील कमी चुकीची उत्तरे असणा-या स्पर्धकास विजेता घोषित करण्यात येईल.

III. **इव्हेंट III** - जर दोन स्पर्धकांना समान गुण मिळाल्यास, त्यांचे चुकीच्या उत्तरांची गणना करुन, त्यातील कमी चुकीची उत्तरे असणा-या स्पर्धकास विजेता घोषित करण्यात येईल.

IV. संघाच्या एकुण कामगिरीवरुन सर्वोत्तम टिम निवडणेकामी त्या टिमच्या इव्हेट I चे गुण (त्यामध्ये दोन्ही स्पर्धकांचे गुणांची सरासरी) + इव्हेंट II चे गुण + इव्हेंट III चे गुण ग्राहय धरले जातील.

V. एका पेक्षा अधिक संघास समान गुण असतील तेव्हा, ज्या संघाची इव्हेंट मधील सरासरी जास्त असेल तो संघ विजेता ठरेल.

VI. जेव्हा एकुण कामगिरीचे गुण समान असतील तेव्हा, इव्हेंट 1 मध्ये ज्या स्पर्धकाचे वैयक्तीक गुण सर्वात जास्त असतील, त्या संघास विजेता ठरविले जाईल.

**७. अभ्यासक्रम -**

**इव्हेट I** - १. संगणकाचे मुलभुत तत्वे.

२. संगणकाचे प्रकार.

३. मेमरी डिव्हायसेस..

४. स्टोरेज डिव्हायसेस

५. नंबरींग सिस्टीम

६. संगणकाचे इतर उपकरणे

७. संगणकाचे विविधी पोर्टस व बांधणी

८. विविध सॉफ्टवेअरर्स, ऑपरेटींग सिस्टीम, नेटवर्कींग व सुरक्षा व इतर गोण सॉफ्टवेअरर्स

**इव्हेट II** - MS Office त्यात MS Word MS Power Point MS Excel.

**इव्हेंट III** - VB.NET चा वापर करुन एखादे ॲप्लीकेशन तयार करणे.

८. चषक व पदके याबाबतची यादी ही परिशिष्ट-१ व २ मध्ये देणेत आलेली आहे.

# <u>संगणक जागृती स्पर्धा, प्रवेश पत्र -</u>

१. <u>संघाचे नाव -</u>

२. <u>संघ प्रमुख अधिकारी यांचे नाव -</u>

| अ.नं | स्पर्धकाचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |

प्रमाणित करण्यात येते की,

१. वरील प्रत्येक स्पर्धकाची पोलीस खात्यामध्ये एक वर्षाचा सेवाकाल पुर्ण झालेला आहे (स्पर्धेच्या दिनांकापर्यंत).
२. वरील पैकी कोणत्याही स्पर्धकाने मागिल तीन वर्षातील अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यांमध्ये भाग घेऊन त्यामध्ये १, २ वा ३ क्रमांकाचा विजेतेपद मिळविलेले नाही.
३. वरील स्पर्धकांची प्रवेश शुल्क हे "महाराष्ट्र राज्य पोलीस डयूटी मीट फंड यांचे खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

विपोमनि/पो. आयुक्त.

# ५. ॲन्टी सबोटेज चेक स्पर्धा

## १. सर्वसाधारण नियम --

i. प्रत्येक स्पर्धकाचा पोलीस खात्यामध्ये एक वर्षाचा सेवाकाल पुर्ण झालेला असावा (स्पर्धेच्या दिनांकापर्यंत).
II. वरील पैकी कोणत्याही स्पर्धकाने मागिल तीन वर्षात अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यांमध्ये भाग घेऊन त्यामध्ये १, २ वा ३ क्रमांकाचे विजेतेपद मिळविलेले नसावे.
III. प्रत्येक संघात कमीत कमी ४ अधिकारी/कर्मचारी किंवा जास्तीत जास्त अधिकारी / कर्मचारी हे स्पर्धक म्हणून भाग घेतील?
IV. प्रत्येक संघातील दोन स्पर्धक या स्पर्धेच्या चार उप-प्रकारांपैकी फक्त दोन उप- प्रकारा मध्ये सहभागी होऊ शकतात?
V. प्रात्यक्षिक परीक्षेनंतर ज्या स्पर्धा प्रकारात तोंडी परिक्षा आहे त्या स्पर्धेकरिता स्पर्धकांना तोंडी परीक्षा देणे अनिवार्य आहे.
VI. सर्व स्पर्धक त्यांना लागणारे स्पर्धेचे सुस्थितीतील साहित्य आपल्या सोबत आणतील. आयोजकांकडुन कोणतेही साहित्य पुरवील जाणार नाही.

## २. स्पर्धेस लागणारे साहित्य

I. स्फोटक शोधक
II. Explosive Detector
III. HHMD
IV. NLJD
V. सर्च लाईट
VI. मोठा आरसा
VII. प्रॉडर
VIII. इतर साहीत्य

**३. स्पर्धेचे प्रकार या स्पर्धेचे खालीलप्रमाणे चार उप प्रकार आहेत.**

## i. लॉन सर्च

या स्पर्धेसाठी एका मोकळ्या लॉन / मातीचे मैदानामध्ये एकूण १० आय. डी. वेगवेगळया ठिकाणी लपवून ठेवण्यात येतात. त्या आय.डी. स्पर्धकाने २० मिनीटामध्ये शोधून काढावयाच्या असतात. या स्पर्धेस एकूण १०० असून, त्यामध्ये आय.डी.शोधणे यास ४० गुण, साहीत्य हाताळणे १० गुण. आय.डी. शोधण्याच्या पध्दतीस १० गुण, स्फोटक पदार्थाची ओळख व त्यातील समाविष्ठ घटक सांगणे यास २० गुण, तोंडी परीक्षा २० गुण असे आहे. या स्पर्धेमध्ये एका संघाचे जास्तीत जास्त दोन स्पर्धक भाग घेऊ शकतात.

## ii. व्हेईकल सर्च

या स्पर्धाप्रकारास एकुण १०० गुण आहेत. या स्पर्धा प्रकारामध्ये एक व्ही.आय.पी. मोटर कार मध्ये १० आय.डी. वेगवेगळया ठिकाण लपविण्यात येतात. त्या आय.डी. स्पर्धकाने २० मिनीटामध्ये शोधुन काढावयाचे असतात, त्यासाठी ६० गुण आहेत. साहीत्य हाताळणी करत २० गुण, आय.डी. शोधण्याच्या पध्दतीस २० गुण असतात. या स्पर्धेत एका संघाचे जास्तीतजास्त दोन स्पर्धक भाग घेऊ शकतात.

## III. रुम सर्च

या स्पर्धाप्रकारास एकूण १०० गुण आहेत. त्यामध्ये एक सर्वसाधारण व्ही.आय.पी. रुम मध्ये १० आय.डी. वेगवेगळया ठिकाणी लपविण्यात येतात. त्या आय.डी. स्पर्धकाने २० मिनीटामध्ये शोधून काढावयाचे असतात, त्यास ६० गुण आहेत. साहीत्य हाताळणी करता २० गुण आय.डी. शोधण्याच्या पध्दतीस २० गुण असतात. या स्पर्धेत एक संघ जास्तीतजास्त दोन स्पर्धक भाग घेऊ शकतात.

## iv. ॲक्सेस कंट्रोल

या स्पर्धाप्रकारास एकुण १०० गुण आहेत. यामध्ये एका इसमाचे शरीरावर १० आय डी लपविले जातात. व तो इसम व्ही.आय.पी. रुम मध्ये जाताना दरवाजात त्यास DFMD व HHMD व्दारे तपासले जाते त्या करीता प्रत्येक स्पर्धकास तीन मिनीटांचा वेळ दिला जातो, वास ६० गुण आहेत, तसेच साहीत्य हाताळणेला १० गुण, आय डी शोधण्याच्या पध्दतीला १० गुण व तोंडी परीक्षेस २० गुण दिले जातात. या स्पर्धेत एका संघाचे जास्तीतजास्त दोन स्पर्धक भाग घेऊ शकतात.

## ४. आयोजनाची पध्दत

I. या स्पर्धेतील प्रत्येकी संघास घातपात विरोधी तपासणी करीता २० मिनीटांचा कालावधी दिला जाईल व त्यानंतर तोंडी परीक्षा घेण्यात येईल.

II. प्रत्येक उप प्रकार हा १०० गुणांचा असेल. यापैकी ग्राऊंड सर्च व ॲक्सेस कंट्रोल या दोन उपप्रकारात २० गुणांची तोंडी परीक्षा व ८० गुणांचे प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल.

**५. परीक्षक -**

या स्पर्धेसाठी, या स्पर्धा समितीचे प्रमुख व इतर दोन घातपात विरोधी पथकातील तज्ञ पोलीस अधिकारी/कर्मचारी हे परिक्षक म्हणून काम पहातील.

**६. चषक व पदके -**

I. ॲन्टीसेबोटेज चेक स्पर्धेसाठी विजेत्या संघास फिरता चषक देण्यात येईल. तसेच ज्या संघाची कामगिरी सर्वोत्तम असेल त्या संघास श्री. ए. एम. कामठे यांचे नावे असलेला फिरता चषक प्रदान करण्यात येईल.

II. प्रत्येक उप स्पर्धाप्रकारातील १, २ वा ३ क्रमांकाचे स्पर्धकांना सुवर्ण, रजत व कांस्य पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील.

III. चषक व पदके याबाबतची यादी परिशिष्ट-१ व २ येथे देण्यात आली आहे.

# ॲन्टी सबोटेज चेक स्पर्धा प्रवेश पत्र

१. संघाचे नाव -

२. संघ प्रमुख अधिकारी यांचे नाव -

| अ.नं | स्पर्धकाचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |

प्रमाणित करण्यात येते की,

१. वरील प्रत्येक स्पर्धकाची पोलीस खात्यामध्ये एक वर्षाचा सेवाकाल पुर्ण झालेला आहे (स्पर्धेच्या दिनांकापर्यंत).
२. वरील पैकी कोणत्याही स्पर्धकाने मागिल तीन वर्षातील अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यांमध्ये भाग घेऊन त्यामध्ये १, २ वा ३ क्रमांकाचा विजेतेपद मिळविलेले नाही.
३. वरील स्पर्धकांची प्रवेश शुल्क हे "महाराष्ट्र राज्य पोलीस डयूटी मीट फंड यांचे खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

विपोमनि/पो. आयुक्त.

# ६. <u>श्वान स्पर्धा</u>

या स्पर्धेचा उद्देश श्वानांचे व्यावसायिक कौशल्य, त्यांची शिस्त व कार्यक्षमता वाढविणे हा आहे.

**१) सर्वसाधारण नियम -**

I. पोलीस श्वान स्पर्धा ही राज्यातील सर्व पोलीस घटकातील श्वानांसाठी खुली आहे.

II. श्वानस्पर्धेसाठी येण्या-या प्रत्येक श्वानाचे उत्पतीबाबतचे प्रमाणपत्र व त्याचे भारतातील कोणतेही केनल क्लब मध्ये रजिस्ट्रेशन केलेबाबतची कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

III. कोणत्याही श्वानाचे वय १८ महिन्यापेक्षा कमी नसावे.

IV. श्वान स्पर्धेत भाग घेणा-या प्रत्येक श्वानास स्पर्धेच्या २१ दिवस अगोदर लसीकरण करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे पशुवैद्याकडुन तपासणी होवुन प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

V. जो श्वान अंधळा, बहिरा, अपंग असलेला अथवा तो कोणत्याही आजाराने व्यथीत असा असल्यास, त्यास स्पर्धेत सहभागी करुन घेतले जाणार नाही.

VI. श्वानहस्तक स्पर्धेसाठी गणवेशात हजर राहतील.

VII. श्वान हस्तक हे स्पर्धा चालु असताना आपल्या श्वानास प्रशंसा करण्याच्या उददेशाने श्वानाच्या अंगावरुन हात फिरवु शकतात. परंतु त्यांनी आपल्या श्वानास खाण्यास काही देऊ नये.

VIII. एका संघामध्ये कमीत कमी ३ श्वान असतील व २ पेक्षा अधिक श्वान स्पर्धेच्या एका उप प्रकारामध्ये भाग घेऊ शकणार नाहीत.

IX. ज्या श्वानाने मागील वर्षाच्या अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये पदक मिळविलेले असेल तो यावर्षीच्या महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये भाग घेऊ शकणार नाही.

**२) परीक्षक -** या स्पर्धेसाठी या स्पर्धा समितीचे प्रमुख व इतर दोन ते तीन तज्ञ श्वान प्रशिक्षक हे परिक्षक म्हणुन काम पहातील. परिक्षक हे, सेवा निवृत्त अथवा सेवेत असणारे राज्य पोलीस दल / केंद्रिय सुरक्षा बल / केंद्रिय रिझर्व्ह पोलीस फोर्स/ एन. डी. आर. एफ. यामधील तज्ञ श्वान प्रशिक्षक अधिकारी अथवा कर्मचारी असतील.

**३)स्पर्धा प्रकार** - श्वान स्पर्धा यातील स्पर्धा या तीन उप प्रकार खालीलप्रमाणे असतील

**I. गुन्हेशोधक (Tracker Test) -**

या स्पर्धा प्रकारात एकुण ४०० गुण असून ते खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १. श्वानाचा आज्ञाधारकपणा | २५ गुण |
| २. अन्न नाकारणे - | २५ गुण. |
| ३. दोन अडथळे पार करणे | २५ गुण. |
| ४. वस्तुचा शोध घेणे | २५ गुण |
| ५. सहा रुमालाचे वास घेऊन योग्य तो इसम ओळखणे | ५० गुण |
| ६. वासावरुन वस्तुचा / इसमाचा शोध घेणे | ५० गुण |
| ७. गुन्हेगाराचे वस्तुच्या वासावरुन माग काढणे | २०० गुण |
| | एकूण ४०० गुण |

**II. स्फोटक पदार्थाचा शोध घेणे (Explosive Test)**

या स्पर्धा प्रकारात एकूण ४०० गुण असून ते खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १. श्वानाचा आज्ञाधारकपणा - | २५ गुण. |
| २. अन्न नाकारणे - | २५ गुण |
| ३. इमारतीमध्ये स्फोटकाचा शोध घेणे - | ७५ गुण |
| ४. मोकळया मैदानात स्फोटकाचा शोध घेणे - | १०० गुण |
| ५. वाहनातील स्फोटकाचा शोध घेणे - | ७५ गुण |
| ६. सामानातील स्फोटकाचा शोध घेणे - | ६० गुण |
| ७. इसमाच्या शरीरावरील स्फोटकाचा शोध घेणे - | ४० गुण |
| | एकूण ४०० गुण |

**III. अंमली पदार्थाचा शोध घेणे (Narcotics Test) -**

या स्पर्धा प्रकारात एकुण ४२५ गुण असून ते खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १. श्वानाचा आज्ञाधारकपणा | २५ गुण |

| | |
|---|---|
| २. अन्न नाकारणे - | २५ गुण. |
| ३. इमारतीमध्ये अंमली पदार्थाचा शोध घेणे - | ७५ गुण. |
| ४. मोकळया मैदानात अंमली पदार्थाचा शोध घेणे - | ७५ गुण |
| ५. वाहनातील अंमली पदार्थाचा शोध घेणे- | ७५ गुण |
| ६. सामानातील अंमली पदार्थाचा शोध घेणे - | १०० गुण |
| ७. इसमाच्या शरीरावरील अंमली पदार्थाचा शोध घेणे - | ५० गुण |
| | एकूण ४२५ गुण |

## ४) श्वान स्पर्धा आयोजनाची मार्गदर्शक तत्वे -

### अ. गुन्हेशोधक (Tracker Test) -

१. यामध्ये श्वानाच्या अज्ञाधारकपणाची परीक्षा घेतली जाते. श्वानास-Heel Free Sit, Up व Come हे चार आदेश दिले जातात, त्यावेळेस श्वानाने एकाच आदेशावर काम करणे आवश्यक आहे. एका पेक्षा जास्त आदेश दयावे लागल्यास त्याचे ५ गुण बजा केले जातील. तसेच श्वान चालताना त्याने हस्तकाचे डावे बाजुने बरोबरीत चालणे अपेक्षित आहे. जर तो पुढे किंवा मागे चालत असल्यास त्याचे ५ गुण वजा केले जातील.

२. अन्न नाकारणे - श्वानास त्याच्या हस्तकाशिवाय अनोळखी इसमाने अन्न दिल्यास ते त्याने नाकारणे आवश्यक आहे.

३. दोन अडथळे पार करणे - दोन अडथळयामध्ये कमीत कमी १० फुटाचे अंतर - असावे व त्यांची उंची ३ फुट असावी. यामध्ये हस्तकाच्या एकाच आदेशावर श्वानाने अडथळे पार करुन अडथळयांपलीकडील ठेवलेली वस्तु आणने अपेक्षित आहे. यासाठी देण्यात येणा-या प्रत्येक जास्तीच्या आदेशाला ५ गुण कमी केले जातील. तसेच श्वानच्या तोंडातुन वस्तु पडल्यास त्याचे ५ गुण कमी केले जातील.

४. वस्तुचा शोध घेणे - यामध्ये हस्तक आपली डायरी अथवा पाकीट ५० यार्डावर ठेवेल व परत त्या श्वानला आदेश देऊन श्वानाला सदरची वस्तु आणनेकामी पाठवेल. ही वस्तु आणताना श्वानाने त्या वस्तुबरोबर खेळु नये अथवा ती वस्तु पाडु नये अन्यथा ५ गुण वजा केले जातील. यासाठी देण्यात येणा-या प्रत्येक जास्तीच्या आदेशाला ५ गुण कमी केले जातील.

५. सहा रुमालाचे वास घेऊन योग्य तो इसम ओळखणे यामध्ये ६ इसमांना ६ - रुमाल देऊन उभे केले जाईल. त्यामध्ये परीक्षकांनी दिलेला रुमालही एखादया इसमाकडे दिलेला असेल. सदरचा इसमांमधून श्वानाने परीक्षकांनी रुमाल दिलेला. इसम शोधुन रुमाल आणने अपेक्षित आहे. चुकीची

इसम शोधल्यास १० गुण वजा करने जातील. तसेच रुमाल खाली पडल्यास ५ गुण वजा केले जातील. या सर्व प्रक्रीयेस १० मिनीटांचा वेळ दिला जाईल.

६. वासावरुन वस्तुचा / इसमाचा शोध घेणे यामध्ये १० इसमांना एका ठिकाणी उभे केले जाईल व त्यामध्ये ज्या संशयीत इसमाचा शोध घ्यावायाचा आहे, त्यासही तेथे उभे केले जाईल. त्या संशयीत इसमाच्या रुमालाचा अथवा बुटाचा किंवा इतर वस्तुचा वास श्वानास देण्यात येइल. त्यावरुन श्वानाने त्या संशयीत इसमांवर उडीमारुन ओळखणे अपेक्षित आहे. चुकीचे इसमास ओळखल्यास ५ गुण वजा केले जातील.

७. गुन्हेगाराचे वस्तुच्या वासावरुन माग काढणे माग काढण्याचे अंतर १ कि.मी.पेक्षा कमी नसावे. संशयीत इसमाच्या रुमालाचा अथवा बुटाचा किंवा इतर वस्तुपैकी एक वस्तु ट्रॅकवर ३० फुटाच्या अंतरावर ठेवली जाईल. सदर वस्तुचा वास श्वानास देऊन, त्या संशयीत इसमाचा माग काढून, त्यास श्वानाने शोधणे अपेक्षित आहे. जर श्वान भटकल्यास त्यास पुन्हा संशयीत इसमाच्या वस्तूंचा वास देता येणार नाही. श्वान १०० यार्डापर्यंत भटकल्यास त्यास स्पर्धेस अपात्र ठरविण्यात येईल. परंतु जर पाणी भिंत असे अडथळे मार्गात असतील तर त्या ठिकाणी श्वानास संशयीत इसमाचे वस्तुचा वास देता येईल. स्पर्धा संपण्याचे मार्गावर शेवटी जेथे संशयीत उभा केला असेल तेथे एक परिक्षक हजर राहील. संपूर्ण परिक्षेला ४५ मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.

**(ब) स्फोटक पदार्थाचा शोध घेणे (Explosive Test)** सदर स्पर्धेकामी कमी क्षमतेचे स्फोटके जसे गन पावडर व जास्त क्षमतेचे स्फोटके जसे TNT, RDX, डायनामाईट यांचा वापर केला जाईल व स्पर्धेकरीता लपविल्या जाणा-या स्फोटकाचे वजन १०० ग्रॅम पेक्षा कमी नसावे.

१. यामध्ये श्वानाच्या अज्ञाधारकपणाची परीक्षा घेतली जाते. श्वानास Heel Free Sit Up व Come हे चार आदेश दिले जातात. प्रत्येक वेळेस श्वानाने एकाच आदेशावर काम करणे आवश्यक आहे. एका पेक्षा जास्त आदेश दयावे लागल्यास त्याचे ५ गुण वजा केले जातील. तसेच श्वान चालताना त्याने हस्तकाचे डावे बाजूने बरोबरीत चालणे अपेक्षित आहे. जर ते पुढे किंवा मागे चालत असल्यास त्याचे ५ गुण वजा केले जातील.

२. अन्न नाकारणे श्वानास त्याच्या हस्तकाशिवाय अनोळखी इसमाने अन्न दिल्यास ते त्याने नाकारणे आवश्यक आहे.

३. मोकळया मैदानातील स्फोटकाचा शोध घेताना मोकळे मैदान हे ३० x ३० आकाराचे असावे. दोन स्फोटकाची पाकीटे मैदानामध्ये ३ ते ६ इंचाचा खड्डा करुन त्यात पुरण्यात येतील. हस्तकाचे "स्मेल, गो, फाइंड" या आदेशावरुन श्वानाने पुरलेल्या ठिकाणी जाऊन बसणे व भुंकणे अपेक्षित आहे. त्यासाठी १५ मिनीटांचा कालावधी असेल.

४. वाहनातील स्फोटकाचा शोध - यामध्ये दोन स्फोटकांची पाकीटे बस, ट्रॅक्टर, ट्रक, दुचाकी, चारचाकी यामध्ये लपविली जातील. श्वान हस्तकाच्या आदेशावरुन श्वानाने वाहनाच्या बाहेरच्या बाजुस व त्यानंतर वाहनाच्या आतील बाजुस शोध घेणे अपेक्षित आहे. प्रत्येक अतिरिक्त आदेशाकरिता गुण कमी होतील. तसेच वाहनामध्ये शोध घेताना बाहेरच्या बाजुस शोध न घेता, प्रथम वाहनाच्या आतील बाजुस शोध घेण्याकरीता गेल्यास १० गुण कमी केले जातील. त्यामध्ये मोठ्या वाहनासाठी १५ मिनीटे, लाईट वाहनासाठी १० मिनीटे आणि दुचाकीसाठी ५ मिनीटे असा कालावधी देण्यात येईल.

५. इमारतीमध्ये स्फोटकाचा शोध घेणे - यामध्ये दोन ते तीन खोल्या असलेल्या घरामध्ये दोन स्फोटकांची पाकिटे लपविली जातील. सदरची स्फोटकाची पाकिटे हे अशा ठिकाणी ठेवावी की, तेथे श्वानास पोहोचुन वास घेता येईल. तसेच ती ५ फुटापेक्षा जास्त उंच ठिकाणी ठेवण्यात येऊ नयेत. खोलीमध्ये दैनंदिन कामासाठी वापरण्यात येणारे घर अथवा ऑफिस यातील वस्तु असाव्यात. यासाठी प्रत्येक खोलीकरीता १० मिनीटांचा कालावधी असेल.

६. इसमाच्या शरीरावरील स्फोटकाचा शोध घेणे - या स्पर्धेसाठी कमीत कमी १० इसमांचा उपयोग करण्यात येईल. त्यापैकी एका इसमाकडे स्फोटक देण्यात येईल. ते सर्व इसम एका लाईनमध्ये उभे राहतील. श्वान हस्तकाने श्वानास "गो" असा आदेश दिल्यावर श्वान ज्या इसमाकडे स्फोटक आहे त्या इसमासमोर उभा राहील किंवा भुंकेल असे अपेक्षित आहे. त्यासाठी एकुण १० मिनीटांचा कालावधी असेल.

७. सामानातील स्फोटकाचा शोध घेणे - या स्पर्धेकरीता सुटकेस, बेडींग, फ्लॉवर पॉट, कार्टून असे एकूण कमीत कमी १० वस्तु वापरण्यात येतील व त्यापैकी दोन वस्तुमध्ये स्फोटके लपविली जातील. श्वानाने स्फोटक असलेल्या वस्तु शोधणे अपेक्षित आहे.त्यासाठी एकुण कालावधी १० मिनीटांचा असेल.

**८. इतर सुचना -**

१. श्वानाने स्फोटकाचा शोध घेतल्यानंतर त्याने स्फोटकाकडे तोंड करुन स्फोटकापासून ६० से.मी अंतरावर बसणे अपेक्षित आहे.
२. चुकीची वस्तु शोधल्यास १० गुण कमी केले जातील.
३. लपविण्यात येणार स्फोटक हे १ तास अगोदर लपविण्यात यावेत जेणे करुन त्याचा वास सदर ठिकाणी पसरु शकेल.
४. हस्तकाने, लपविलेले स्फोटक शोधणेकामी श्वानास कोणत्याही प्रकारे मदत अथवा इशारा केल्यास ५ गुण कमी केले जातील.
५. गुण देताना हस्तकाचे वृत्तीचा तसेच श्वानावर त्याचे असलेले नियंत्रणाचा व स्फोटक शोधणेकामी हवेच्या प्रवाहाच्या दिशेचा योग्य वापर करण्याच्या कलेचा विचार परिक्षकांकडुन केला जाईल.

**क) अंमली पदार्थाचा शोध घेणे (Narcotics Test) -**

या स्पर्धेत श्वानास पटटा बांधलेला नसावा व शोध घेताना श्वान हस्तकाच्या पुढे असावा. या स्पर्धेमध्ये चरस, अफु, हेरॉईन, ब्राऊन शुगर, मॉर्फिन इत्यादी अंमली पदार्थाचा वापर करण्यात येईल व कमीत कमी १०० ग्रॅम वजनाच्या अंमली पदार्थाचा वापर हा शोध घेणेकामी करण्यात येईल.

१. यामध्ये श्वानाच्या अज्ञाधारकपणाची परीक्षा घेतली जाते. श्वानास Heel Free, Sit to व Come हे चार आदेश दिले जातात त्यावेळेस श्वानाने एकाच आदेशावर काम करणे आवश्यक आहे. एका पेक्षा जास्त आदेश दयावे लागल्यास त्याचे ५ गुण वजा केले जातील.तसेच श्वान चालताना त्याने हस्तकाचे डावे बाजुने बरोबरीत चालणे अपेक्षित आहे. जर ते पुढे किंवा मागे चालत असल्यास त्याचे ५ गुण वजा केले जातील.

**२.अन्न नाकारणे -** श्वानास त्याच्या हस्तकाशिवाय अनोळखी इसमाने अन्न दिल्यास ते त्याने नाकारणे आवश्यक आहे.

**३. इमारतीमध्ये अंमली पदार्थाचा शोध घेणे** - यामध्ये दोन ते तीन खोल्या असलेल्या - घरामध्ये दोन अंमली पदार्थाची पाकिटे लपविली जातील. सदरची अंमली पदार्थाची पाकिटे हे अशा ठिकाणी ठेवावी की, तेथे श्वानास पोहोचुन वास घेता येईल तसेच ती ५ फुटापेक्षा जास्त उंच ठिकाणी ठेवण्यात येऊ नयेत. खोलीमध्ये दैनंदिन कामासाठी वापरण्यात येणारे घर अथवा ऑफिस यातील वस्तु असाव्यात. यासाठी प्रत्येक खोलीकरीता १० मिनीटाचा कालावधी असेल.

**४. वाहनातील अंमली पदार्थाचा शोध -** यामध्ये दोन अंमली पदार्थाची पाकीटे बस, ट्रॅक्टर, ट्रक, दुचाकी, चारचाकी यामध्ये लपविली जातील. श्वान हस्तकाच्या आदेशावरुन श्वानाने वाहनाच्या बाहेरच्या बाजुस व त्यानंतर वाहनाच्या आतील बाजुस शोध घेणे अपेक्षित आहे. प्रत्येक जास्तीच्या आदेशाकरिता गुण कमी होतील. तसेच वाहनामध्ये शोध घेताना, प्रथम बाहेरच्या बाजुस शोध न घेता, प्रथम वाहनाच्या आतील बाजुस शोध घेण्याकरीता गेल्यास, १० गुण कमी केले जातील. त्यामध्ये मोठ्या वाहनासाठी १५ मिनीटे, लहान वाहनासाठी १० मिनीटे आणि दुचाकीसाठी ५ मिनीटे असा कालावधी देण्यात येईल.

**५. सामानातील अंमली पदार्थाचा शोध घेणे -** या स्पर्धेकरीता सुटकेस, बेडींग, फ्लॉवर पॉट, कार्टुन इत्यादी अशा कमीत कमी १० वस्तु वापरण्यात येतील. त्यापैकी दोन वस्तुमध्ये अंमली पदार्थाची पाकीटे लपविली जातील. श्वानाने अंमली पदार्थ असलेल्या वस्तु शोधणे अपेक्षित आहे. त्यासाठी एकुण कालावधी १० मिनीटांचा असेल.

**६. मोकळया मैदानातील अंमली पदार्थाचा शोध -** मोकळे मैदान हे ३० x ३० आकाराचे असावे. दोन अंमली पदार्थाची पाकीटे मैदानामध्ये ३ ते ६ इंचाचा खड्डा करुन त्यात पुरण्यात येतील. हस्तकाचे "स्मेल, गो,फाईड" या आदेशावरुन श्वानाने पुरलेल्या ठिकाणी जाऊन बसणे व भुंकणे अपेक्षित आहे. त्यासाठी १५ मिनीटांचा कालावधी असेल.

**७. इसमाच्या शरीरावरील अंमली पदार्थाचा शोध घेणे** - या स्पर्धेसाठी कमीत कमी १० इसमांचा उपयोग करण्यात येईल. त्यापैकी एका इसमाकडे अंमली पदार्थ देण्यात येईल ते सर्व इसम एका लाईनमध्ये उभे राहतील. श्वान हस्तकाने श्वानास गो असा आदेश दिल्यावर श्वान ज्या इसमाकडे अंमली पदार्थ आहे त्या इसमासमोर उभा राहील किंवा भुंकेल असे अपेक्षित आहे. त्यासाठी एकुण १० मिनीटांचा कालावधी असेल.

**८. इतर सुचना**

१. श्वानाने अंमली पदार्थाचा शोध घेतल्यानंतर त्याने अंमली पदार्थाकडे तोंड करून अंमली पदार्थापासून काही अंतरावर बसणे अपेक्षित आहे.

२. चुकीची वस्तु शोधल्यास १० गुण कमी केले जातील.

३. लपविण्यात येणारा अंमलीपदार्थ हा १ तास अगोदर लपविण्यात यावेत जेणे करुन याचा वास सदर ठिकाणी पसरु शकेल.

४. हस्तकाने, लपविलेला अंमली पदार्थ शोधणेकामी श्वानास कोणत्याही प्रकारे मदत अथवा इशारा केल्यास ५ गुण कमी केले जातील.

५. गुण देताना हस्तकाचे वृत्तीचा तसेच श्वानावर त्याचे असलेले नियंत्रणाचा व अंमली पदार्थ शोधणेकामी हवेच्या प्रवाहाच्या दिशेचा योग्य वापर करण्याच्या कलेचा विचार परिक्षकाकडुन केला जाईल.

६. चषक व पदके याबाबतची यादी परिशिष्ट-१ व २ येथे देणेत आलेली आहे.

# श्वान पथक स्पर्धा प्रवेश पत्र

**१. <u>संघाचे नाव-</u>**

**२. <u>संघ प्रमुख अधिकारी यांचे नांव-</u>**

**३. <u>श्वानपथक अधिका-याचे नाव -</u>**

| अ.न. | श्वानाचे नाव | लिंग | श्वानाची जन्म तारीख | श्वानाचा वंश/जात | रंग व ओळख---ण्याची खुण | नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व भारतातील श्वान घरातील पान क्र व तारीख किंवा ज्या देशातुन आयात केला त्या देशाचे नाव | श्वानाचे वंशावळीची कागदपत्रे सोबत जोडली आहेत अगर कसे ? | श्वान हस्तकाचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | | | | | | | | |
| २. | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की,

१. यातील कोणताही श्वान हा १८ महिन्यापेक्षा कमी वयाचा नाही. तसेच स्पर्धक मादी श्वान ही ३३ दिवसांपेक्षा जास्त काळ गर्भधारणा केलेली नाही.
२. यातील कोणताही श्वान अंधळा, बहिरा अथवा तो कोणत्याही संसर्गजन्य आजाराने व्यथीत नाही.
३. यातील श्वानांची नोंदणीप्रमाणपत्रे त्यांचे क्रमांक व भारतातील श्वान घरातील पान क्रमांक तसेच ज्या देशातून त्यांना आयात करण्यात आले त्या देशाचे नांव याबाबतची माहिती स्पर्धेपूर्वी परीक्षकांना देण्यात येईल.
४. वरील पैकी कोणत्याही स्पर्धक श्वानाने व श्वानहस्तकाने मागिल वर्षात अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यांमध्ये भाग घेऊन त्यामध्ये १.२ वा ३ क्रमांकाचा विजेतेपद मिळविलेले नाही.
५. स्पर्धकांचे प्रवेश शुल्क हे "महाराष्ट्र राज्य पोलीस डयूटी मीट फंड" यांचे खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

विपोमनि/पो. आयुक्त.

# <u>परिशिष्ट-१</u>

## महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये दिल्या जाणाऱ्या चषकांची यादी

**A. सायंटीफिक एड इन्वेस्टीगेशन,**

Best Team Performance in Scientific Aid to Investigation

**B. पोलीस फोटोग्राफी,**

Best Team Performance in Police Photography

**C. पोलीस व्हिडीओग्राफी,**

Best Team Performance in Videography Competition

**D. कॉम्प्युटर अवेअरनेस,**

Best Team Performance in Computer Awareness Competition

**E.. ॲन्टी सॅबोटेज चेक स्पर्धा,**

१. Best Team Performance in Anti-Sabotage Check Competition
२. Shri. A.M. kamthe Trophy

**F. श्वान स्पर्धा.**

Best Team Performance in Dog Squad Competition

**G. स्पर्धेत सर्वात जास्त पदके मिळविणा-या संघास**

१. General Championship Trophy

- स्पर्धेमध्ये प्राप्त प्रत्येक सुवर्ण पदकास ५ पॉईंट, रजत पदकास ३ पॉईंट व कास्य पदकास २ पॉईंट देण्यात येतील.
- जनरल चॅम्पिअन ट्रॉफी करीता संघ निवडताना संघाने एकुण पटकविलेल्या पदकानुसार प्राप्त पॉईंट एकत्रित मोजुन संघाची निवड केली जाईल.
- स्पर्धेमध्ये एखादया विषयात दोन स्पर्धकांना समान गुण मिळाल्यास दोन्ही स्पर्धकांना त्याच रॅंक चे पदक व सारखेच पॉईंट देण्यात येईल.

२. CID Centenary Trophy

**H. पदक तालिकेत दोन क्रमांकाचे संपास -**

Runner Up Trophy

# परिशिष्ट-२

## महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मळाव्यामध्ये दिल्या जाणाऱ्या पदकांची यादी.

| अ.न. | संघ सदस्य | उप-प्रकार | पदके | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सुवर्ण | रजत | कांस्य |
| 1. | Scientific aid to investigation - Competition | 1. Forensic Science Written Test | 1 | 1 | 1 |
| | | 2.Finger Prints Test | 1 | 1 | 1 |
| | | 3.Crime Investigation, Criminal Laws, Rules, Procedures & Court Judgements | 1 | 1 | 1 |
| | | 4.Labelling & Packing Test | 1 | 1 | 1 |
| | | 5.Medico - Legal (Oral) | 1 | 1 | 1 |
| | | 6.Photography Test | 1 | 1 | 1 |
| | | 7.Observation Test | 1 | 1 | 1 |
| | | 8.Police Portrait Test | 1 | 1 | 1 |
| 2. | Police Photography Competition | - | 1 | 1 | 1 |
| 3. | Police Videography Competition | - | 1 | 1 | 1 |
| 4. | Antisabotage Check Competition | 1) Room Search | 1 | 1 | 1 |
| | | 2) Ground Search | 1 | 1 | 1 |
| | | 3) Vehicle Search | 1 | 1 | 1 |
| | | 4) Access Control | 1 | 1 | 1 |
| 5. | Computer Awareness Competition | 1) Objective Test (ONLINE) | 1 | 1 | 1 |
| | | 2) M.S.Office | 1 | 1 | 1 |
| | | 3) DOT NET/JAVA (ONLINE) | 2 | 2 | 2 |
| 6. | Dog Squad Competition | 1) Tracking | 1 | 1 | 1 |
| | | 2) Explosives | 1 | 1 | 1 |
| | | 3) Narcotics | 1 | 1 | 1 |
| **एकुण पदके** | | | 21 | 21 | 21 |

# परिशिष्ट-३

## महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा आयोजित करणेकामी प्रथमतः आयोजन समिती गठित करण्यात येते.

| Sr.No | NAME | OFFICE NO | MOBILE NO |
|---|---|---|---|
| 1 | Chairman :<br>DGP, M.S. Mumbai | | |
| 2 | Co-Chairman:<br>ADG, CID M.S. Pune | | |
| 3 | Member:<br>CP, Pune City | | |
| 4 | ADG (Admin), M.S. Mumbai | | |
| 5 | ADG (Wirless), M.S. Pune | | |
| 6 | CP. Pimpari Chinchwad | | |
| 7 | ADG, SRPF, M.S. Mumbai | | |
| 8 | Spl.IGP (Admin), M.S. Mumbal | | |
| 9 | Spl.IGP, CID M.S. Pune | | |
| 10 | Spl.IGP & Director, M.I.A., Pune<br>Addi, Charge Spl.IGP, SRPF, Pune | | |
| 11 | DIGP/Addl.C.P. Technical, M.T., M.S Pune | | |
| 12 | DIG (Admin), CID, M.S., Pune | | |
| 13 | DIG EOW, CID, MS. Pune | | |
| 14 | SP (L& R), CID, M.S. Pune | | |

वरील आयोजन समितीचे अध्यक्षतेखाली, महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन यजमानपद हे ज्या पोलीस आयुक्तालय / परिक्षेत्र यांचेकडे असेल त्या घटकांचे अधिकारी / कर्मचारी यांचे सहभागाने खालील कामकाज समित्यांचे गठण करण्यात येईल. या सर्व समित्यांचे प्रमुख म्हणून पोलीस उपमहानिरिक्षक अथवा पोलीस अधिक्षक दर्जाचे अधिकारी काम पहातील. तसेच या समितीचे कामकाजासाठी करण्यात येणारा पत्रव्यवहारासाठी व समितीसाठी लागणाऱ्या खर्चाचा ताळेबंद ठेवणेसाठी, गुन्हे अन्वेषण विभाग पुणे यांचेकडील पोलीस उप अधिक्षक / पोलीस निरिक्षक दर्जाचे एक अधिकारी यांची नेमणुक प्रत्येक समितीचे सदस्य म्हणुन करण्यात येईल.

आयोजन समिती मार्फत खालील ११ समित्यांचे गठण हे महाराष्ट्र राज्य पोलीस आयोजन कामी करण्यात येते.

१. स्वागत समिती
२. निवास व्यवस्था व दळणवळण समिती.
३. मैदान व्यवस्था समिती.
४. उदघाटन व समारोप समिती
५. बक्षिस व प्रमाणपत्र समिती
६. भोजन मनोरंजन समिती
७. लेखा व प्रशासन समिती
८. अपील व निकाल समिती
९. प्रसार माध्यमे समिती
१०. स्पर्धा आयोजन समिती

तसेच वरील समित्यांव्यतिरिक्त स्पर्धा आयोजनासाठी खालील सहा स्पर्धा समित्या गठीत करण्यात येतील. नमुद स्पर्धा समितीचे प्रमुख म्हणून गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा. पुणे यांचेकडील पोलीस अधिक्षक दर्जाचे अधिकारी काम पहातील. तसेच सदर समित्यांमध्ये संबंधित विषयाचे तज्ञ शासकीय अधिकारी यांची सदस्य म्हणून नेमणुक करण्यात येईल. तसेच प्रत्येक समितीमध्ये गुन्हे अन्वेषण विभाग पुणेकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणुक करण्यात येईल.

# **धन्यवाद.. !!**